# मराठी साप्ताहीक पोलीस पत्रिका
# कार्यालय पोलीस अधीक्षक
# नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर

अ.क. 12 दिनांक 17.03.2025 ते 21.03.2025 ( भाग 1 ते 5 )


## भाग –1 (नियुक्ती,निवृत्त,बदली,पदान्नती)

**१) क्रमांक नाजिग्रा/डी– १३/ मृतक– मपोशि/८३० ज्योती /2700/२०२४ नागपूर, दिनांक :–** 19/03/2025

**≺ आ दे श ≻**

पोलीस अधीक्षक ,नागपुर जिल्हा (ग्रामिण) नागपुर यांचे आस्थापनेवरिल खालील नमुद महीला पोलीस अंमलदार यांचे निधन झाले असल्याने त्यांचे नावासमोर नमुद केलेल्या दिनांका पासुन त्यांचे नांव या जिल्हयाचे आस्थापनेवरून कमी करण्यात येत आहे.

| अ. क्र | कर्मचा–याचे नांव व /ब.नं हुददा | नेमणुक | मृत्युचे कारण | मृत्यु दिनांक | आस्थपनेवरून नांव कमी करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | **दिवंगत मपोशि/८३० ज्योती मोहन पवार (राठोड ),** | पोलीस मुख्यालय, नागपुर जिल्हा ग्रामिण | दिर्ध आजाराने निधन | ०५/१२/२०२४ | ०५/१२/२०२४ |

**२)क्रमांक :- नाजिग्रा/ डि-९/पो.अं. नियुक्ती /नविन बक्कल/ २७४२/ २०२५ नागपुर दिनांक २०/०३/२०२५**

**:-आदेश -:**

नागपुर जिल्हा (ग्रामीण) नागपुर या आस्थापनेवर घेण्यांत आलेल्या पोलीस शिपाई सन-२०२२-२३ च्या भरतीमध्ये या कार्यालयाचे आदेश क्रमांक नाजिग्रा/ डि-९/ पोशि भरती २०२२-२३/नियुक्ती आदेश/२४६२/२०२५, दिनाक ११/०३/२०२५ अन्वये खालील नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना नियुक्ती देण्यात आलेले असुन त्यांना नागपुर जिल्हा (ग्रामीण) नागपुर घटकात सामावुन घेवुन या घटकाच्या पोलीस दलात रिक्त असलेले बुक्कल नंबर प्रदान करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | चेस्ट क्रमांक | उमेदवारांचे संपुर्ण नाव | लिंग | प्रदान करण्यात येणारे |
|---|---|---|---|---|
| १ | ५१६१ | संजय चुन्नीलाल डोये | बक्कल नंबर | पुरूष |

## भाग –2 (रजा,वेतननिश्चती)

**१) क्र:-नाजिग्रा / डी- ११/ मपोशी /१७२ / वाढीव अर्जित रजा / ३२७६८ /२०२५ नागपुर दिनांक १७ / ०३ / २०२५**

**आदेश**

खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांना ०५ दिवस वाढीव अर्जित रजा मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव हुद्दा व बक्क्ल नंबर | नेमणूक | रजेचा प्रकार |
|---|---|---|---|
| 1 | मपोशी /१७२ स्वाती नागदेवे | पोलीस मुख्यालय,नागपूर ग्रामीण, नागपूर | 5 दिवस वाढीव अर्जित रजा |

**२)क्र:-नाजिग्रा / डी- ११/ सफौ-३९५ /नागोसे/ से.नि.पूर्व रजा /३२७६६/२०२५ नागपुर दिनांक १७/०३/२०२५**

आदेश

सफौ/395देवराव लक्ष्मन नागोसे, नेमणुक पोलीस स्टेशन मौदा नागपूर ग्रामीण नागपुर यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक (६६) १ मधील तरतुदीनुसार यांचे दिनांक 01/04/2025 ते 30/06/2025 पर्यंत एकूण 90 **दिवस** निवृत्तीपुर्व रजा 190(दिवस अर्धवेतनी रजा खर्ची टाकून) मात्र अर्धवेतनी रजा घेताना वैद्यकीय प्रमाणपत्र आधारेमंजूर करण्यात येत आहे.

2/- प्रमाणित करण्यात येते कि, सफौ/395 देवराव लक्ष्मन नागोसे, नेमणुक पोलीस स्टेशन मौदा नागपूर ग्रामीण नागपुर यांचे रजेच्या कालावधीत पूर्वतेनंतर ते ज्या पदावरून रजेवर गेले होते. त्याचे पदावर किंवा इतर ठिकाणी अशा समपदावर की समान भत्ते मिळतील अशा ठिकाणी नियुक्ती करण्यात येईल.

3/- प्रमाणित करण्यात येते की, सफौ/395 देवराव लक्ष्मन नागोसे, नेमणुक पोलीस स्टेशन मौदा नागपूर ग्रामीण नागपुर हे उपरोक्त रजेवर गेले नाहीत तर त्यांचे पदावर स्थानापन्न राहील.

3)क्रमांकः—नाजिया / डी—9—बी / सुधारीत वेतन निश्चिती / 1339 / 2025 / 2702 / 2025 नागपुर दिनांकः— 21 / 03 / 2025

— :आदेशः—

पोशि/१३३९ निसार शेख नेमणुक पो.स्टे.सावनेर यांना या कार्यालयाचे आदेश क्रमांक नाजिग्रा/कसुरी/डी १५/पोशि/१३३९ शेख/२१४७/२०२३ नागपुर दिनांक ०८.०३.२०२३ चे आदेशान्वये,०२ वर्षा करीता पुढील वेतनवाढ रोखण्यातबाबत शिक्षा देण्यात आली होती.

क्रमांक नाप/डी—०५अ/अतिम आदेश/पोशि/१३३९/नासिरशेख/सावनेर/नाग्रा/२०२३/५२८२ नागपुर दिनांक ३१.०७.२०२३चे आदेशान्वये, ०२ वर्षा करीता वेतनवाढ शिक्षेमध्ये अंशत:बदल करुन ०१ वर्षा करीता शिक्षा देण्यात आली आहे. करीता शिक्षा संपल्याने वेतनवाढ खालील प्रमाणे लावण्यात येत आहे.

| **या पुर्वी घेत असलेले वेतन व दिनांक** | | | **सुधारीत देय ठरणारे वेतन व दिनांक** | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | वेतन स्तर | मुळ वेतन | दिनांक | वेतन स्तर | मुळ वेतन |
| दि.०१.०७.२०२२ | एस—०७ | २८४०० | दि.०१.०७.२०२२ | एस—०७ | २८४०० |
| **दि.०१.०७.२०२३**<br><br>**दि.०८.०३.२०२३ चे आदेशान्वये, ०२ वर्षा करीता पुढील वेतनवाढ रोखण्याबाबत शिक्षा.**<br><br>**दि.३१.०७.२०२३ चे आदेशान्वये, ०२ वर्षा करीता वेतनवाढ शिक्षेमध्ये अंशत बदल करुन ०१ वर्षा करीता शिक्षा देण्यात आली आहे.** | एस—०७ | २८४०० | **दि.०१.०७.२०२३** | एस—०७ | २९३००<br>**काल्पनिक वेतनवाढ थकबाकी देय नाही.** |
| दिकृ०१.०७.२०२४ | एस—०७ | २८४०० | **दि.०१.०७.२०२४** | एस—०७ | ३०२०० |

**४)क्रमांक नाजिग्रा/डी—९बी/सेवानिवृत्त/पो.अ./१४७२/अर्जीतरजा रोखाकरण/२७०१/२०२५/नागपूर दिनांकः— २१/०३/२०२५**

— **:आदेशः**—

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे नावसमोर दर्शविल्या प्रमाणे या कार्यालयाचे आदेशानुसार वयाचे ५८ वर्षपुर्ण केल्याने नियत वयोमानाने सेवानिवृत्त करण्यात आले असुन त्यांचे नांव या आस्थापनेवरुन कमी करण्यास आले आहे.त्यांचे रजेखाती त्यांचे सेवानिवृत्त दिनांकास नावासमोर दर्शविल्यानुसार अर्जित रजा शिल्लक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ६८ व महाराष्ट्र शासन वित विभाग निर्णय क्र.अरजा २४०१/८/सेवा —९ दि.१५.०१.२००१ अन्वये सदर पोलीस अंमलदार यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे त्यांचे रजेखाती शिल्लक असलेले अर्जित रजेचे सममुल्य रजा रोखीकरण मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पोलीस कर्मचा—यांचे नांव व हुद्या | आस्थापनेवरुन नांव कमी करण्याचा आदेश क्र व दिनांक | जन्म तारीख | नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त दिनांक | वेतन व स्तर | रजेखाती शिल्लक असलेल्या अर्जीत रजा |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | सफौ/१४७२ राजु | आदेश क्र. नाजिग्रा /डी — | दि.०४.०२.१९६७ | दि.२८.०२.२०२५ | एस — १० | ३०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सुदाम गोमकर नेमणुक पो.स्टे. एमआयडीसी बोरी | १३/नि.व.सेनि/१८९७/ २०२५ नागपुर दिनांक २५. ०२.२०२५ | | | ५४२०० | दिवस |

प्रमाणित करण्यात येते की,उपरोक्त सममुल्य रोखीकरणाबाबत ची नोंद त्याच्या सेवापुस्तकात घेण्यात आलेली.

5) **क्रमांक :- नाजिग्रा / डि-१३ / सु.वे.नि./ सफौ.८०३ /२७१४ / २०२५ नागपुर दि. १९ / ०३/२०२५**

## :- आदेश -:

पोहवा/८०३ रविद्र यादवराव बकाल ,नेमणुक ,पोलीस मुख्यालय,नागपुर ग्रामीण यांना या कार्यालयाचे निलंबन आदेश क्रमांक नाजिग्रा/डि-१०/निलंबन/ पोहवा ८०३ बकाल /८४५/ दिनांक ०१/०२/२०२२ अन्वये, या आदेशान्वये निलंबन करण्यांत आले होते.तसेच या कार्यालयाचे निलंबन मुक्त आदेश क्र.नाजिग्रा/डि-१०/ निलंबन मुक्त / आढावा /माहे -मे /२०२२/३६९७/ दिनांक १७/०५/२०२२ अन्वये ,या आदेशान्वये सदर अंमलदार यांना निलंबनातुन मुक्त करण्यांत आले असुन त्यांचा निलंबन कालावधीचा दिनांक १/०२/२०२२ ते १७/०५/२०२२ पर्यत जसाचा तसा गणण्यात आला होता.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक नाजिग्रा/डि-१०/सफौ-८०३/निलंबन कालावधी निर्णय/२०२५-३१३दिनांक २४/०१/२०२५अन्वये,सदर पोलीस अंमलदार त्यांचा निलंबन कालावधीचा दिनांक १/०२/२०२२ ते १७/०५/२०२२ पर्यतचा **निलंबन कालावधी सर्व प्रयोजनार्थ "कर्तव्यकाळ "(On Duty) गणण्यांत आल्याने त्यांची** वेतनवाढ खालील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

**वेतन संरचना**

पोहवा पदाची वेतनश्रेणी :- २६४००-८३६०० /-
सहा.पोलीस उपनिरीक्षक पदाची वेतनश्रेणी :- २९२००-९२३००/-

**पोहवा/८०३ रविद्र यादवराव बकाल ,नेमणुक ,पोलीस मुख्यालय,नागपुर ग्रामीण**

| सातव्या वेतन आयोगानुसार पोलीस हवालदार पदाची वेतनश्रेणी -२६४००-८३६०० /- मध्ये **विद्यमान वेतन** | | | सातव्या वेतन आयोगानुसार पोलीस हवालदार पदाची वेतनश्रेणी -२६४००-८३६०० /- मध्ये **(१४५३० x २.५७=३७३४२.१) सुधारीत वेतन** | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **पुर्वीचे वेतन** | **मॅट्रीक्स** | **दिनांक** | **सुधारीत वेतन** | **मॅट्रीक्स** | **दिनांक** | **अभिप्राय** |
| १.७.२०२२ | एस-९ | ४६२०० | १.७.२०२२ | एस-९ | ४६२०० | |
| १.७.२०२३ | एस-९ | ४३६०० | १.७.२०२३ | एस-९ | ४७६०० | |
| | | | **१९.९.२०२३ सफौ. पदावर पदोन्नती** | **एस-१०** | **४९६००** | **आ.क्र.८५२६ दि.१९/९/२०२३ अन्वये,** |
| १.७.२०२४ | एस-९ | ४९००० | १.७.२०२४ | एस-१० | ५११०० | |

उपरोक्त पोलीस अंमलदार त्यांची सुधारीत वेतन निश्चिती झाल्याने फरकाची रक्कम देय असल्यास रोखीने अदा करावी. देय-दत्त विवरणपत्र आस्थापना शाखेत न चुकता सादर करावे. सुधारीत वेतननिश्चिती वेतन पडताळणी पथकाच्या अधीन राहुन करण्यात येत असुन शासन परीपत्रक,वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.५२/सेवा-३,दिनांक २२.११.२०२१ अन्वये,अटि व शर्ती नुसार भविष्यात अतिप्रधान झाल्याचे निदर्शनास आल्यास अतिप्रदान वसुल करण्यांत येईल.(पोलीस अंमलदार यांच्याकडुन वचनपत्र फार्म भरुन सेवापटात जोडलेले आहेत.)

**६)क्रः- नाजिग्रा/ ड-९ सी/विपश्यना शिबिर /सफौ- १६७० सनोडिया /१९४४३४९/२०२५ नागपुर ग्रामीण दि.१९ /३/२०२५**

## :- आदेश -:

सफौ./१६७० राजेंद्र धनाराम सनोडिया नेमणुक,बॉम्ब शोधक व नाशक पथक ,नागपुर ग्रामीण यांनी विपश्यना रिसर्च इन्स्टिटयुट,धम्मगिरी, इगतपुरी जि.नाशिक शिबिर येथे विपश्यना कोर्स भाग घेण्यांकरीता यांना शासन निर्णय क्रमांक अरजा २४०२/२७/सेवा-८,दिनांक २७/जुन,२००३ अन्वये ,शासन तरतुदीनुसार अटि व शर्तीच्या अधीन राहुन मंजुर करण्यांत येत आहे .

| अ.क्र. | पोलीस अंमलदारयांचे नाव /ब.न | नेमणुक | यापुर्वी घेतलेली रजा | परावर्तीत रजा मंजुर बाबत |
|---|---|---|---|---|
| १ | सफौ./१६७० राजेंद्र धनाराम सनोडिया | ,बॉम्ब शोधक व नाशक पथक | नाही | १० दिवस |

**७)कंमाक नाजिग्रा / डी–11 / मपोशि-112 / बालसंगोपन रजा / 2025 दिनांक :20 / 02 / 2025**

**< आ दे श >**

खालील नमुद तक्त्यातील मपोशि यांना शा.नि.क्रमांक संकीर्ण–2017 / प्र.क्र.25 / सेवा–6 दिनांक 23 जुलै 2018 व महाराष्ट्र नागरी सेवा (नियम)1981 मधील नियम क.74 च्या तरतुदी नुसार खालील प्रमाणे लहान बाळाचे संगोपन करण्याकरीता 30 दिवस बालसंगोपन रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व हुद्दा | नेमणूक | बालसंगोपण रजा |
|---|---|---|---|
| १ | मपोहवा/११२ स्वाती रमेश झोडापे<br>लग्नानंतरचे नाव स्वाती संजय रहाटे | वाचक शाखा नागपूर , ग्रामीण | **30 दिवस** |

**8)नाजिग्रा /डी-9डी /मो.वा.जो.वर्ग-3 बिमलवार /परिवर्तीत रजा /33185/2025 नागपुर दिनांक 20 / 03/ 2025**

## आदेश

मो.वा.जो. वर्ग-3 मनोज कृष्णस्वामी बिमलवार नेमणूक पोलीस मोटार परिवहन विभाग, नागपूर ग्रामीण नागपूर.यांची खालील नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981 मधील नियम क्र. 61, अन्वये वैदकीय कागदपत्राच्या आधारे रजा मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | दिनांक | दिवस | रजेचा प्रकार | नियम |
|---|---|---|---|---|
| 1 | 28/02/2025 ते 08/03/2025 | 09 | परिवर्तीत रजा | 61 |

**9)क्र:-नाजिग्रा / डी-9डी / पो. अ-2209 / वेतन स्थगित /33186 / 2025 नागपुर दिनांक 20/ 03/ 2025**

**आदेश**

खालील नमुद पोलीस अंमलदार हे कर्तव्यावर अनधिकृतपणे गैरहजर असल्याने त्यांचे माहे 03/2025 पासून पुढील आदेशापर्यंत तात्पुरते वेतन स्थगित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीसअंमलदार यांचे नाव व बक्कल नंबर | नेमणूक | केव्हापासून गैरहजर |
|---|---|---|---|
| 1 | पो. अ. / 2209 आकेश मडावी | पोलीस स्टेशन वेलतूर | दि. 04/03/2025 |

**१०)क्र:-नाजिग्रा /डी-9डी / अतिप्रदान /पोहवा-बियंचा/जारोंडे / २७४५ / 2025 नागपुर दिनांक २१/ ०३/२०२५**

## -:आदेश :-

पोहवा /बियंचा चंद्रकांत भोलानाथ जारोंडे नेमणूक बिनंतारी संदेश विभाग नागपूर ग्रामीण हे दिनांक ३१/०३/२०२५ रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त होत असुन त्यांचे सेवापटात वेतन पडताळणी पथक, नागपुर यांनी आक्षेप नोंदविण्यांत आलेला होता. त्याअनुषंगाने त्यांची सुधारीत वेतननिश्चिती वेतन पडताळणी पथकाच्या अधीन राहुन शासन परीपत्रक, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.५२/सेवा-३, दिनांक २२.११.२०२१ अन्वये, सदर पोलीस अंमलदार त्यांच्याकडुन वचनपत्र लेखी स्वरुपात भरुन घेण्यांत आले, असुल या कार्यालयाचे आदेश क्रमांक नाजीग्रा /डी-९ डी/सु.वे.नि./जारोंडे/७३०/२०२५, दिनांक २२/०१/२०२५ अन्वये, सुधारीत वेतन

निश्चिती करण्यांत आलेली आहे. वेतन पडताळणी पथक यांचे आक्षेपानुसार अतिप्रदान रक्कम **रु.२२६५९४/- (अक्षरी दोन लाख सव्वीस हजार पाचशे चौऱ्यानऊ फक्त**) त्यांना मिळणा-या सेवानिवृत्ती उपदानातुन वसूल करुन शासन जमा करण्यांत यावे.

**११)क्रः-नाजिग्रा / डी-9डी / मपोहवा -रायबोले / परिवर्तीत रजा / ३२७९८/ २०२५ नागपुर दिनांक १९/०३/२०२५**

आदेश

क्रः-नाजिग्रा / डी-9डी / मपोहवा -रायबोले / परिवर्तीत व असाधारण रजा / 1246208 / 2024 नागपुर दिनांक 12/ 08/ 2024अन्वये दिनांक 05/05/2024 ते 24/05/2024 पर्यंत 20 दिवस परिवर्तीत रजा व दिनांक 25/05/2024 ते 12/06/2024 पर्यंत 19 दिवस असाधारण रजा **हा आदेश रद्द करण्यात येत असून** मपोहवा / बियंचा रेणुका समाधान रायबोले,नेमणूक बिनतारी संदेश विभाग ,नागपूर ग्रामीण नागपूर.यांची महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981 मधील नियम क्र. 61,अन्वये वैदकीय कागदपत्राच्या आधारे खालील नमुद केल्याप्रमाणे रजा मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | दिनांक | दिवस | रजेचा प्रकार | नियम |
|---|---|---|---|---|
| 1 | दि. 05/05/2024 ते 12/06/2024 | **39** | परिवर्तीत रजा | 61 |

**१२)क्रमांक -:नाजीग्रा/आस्था/डी-१३/वे.नि/पदोन्नती-पोना ते हवा/१६०८/२०२४/नागपूर दिनांक १८/०२/२०२५**

**-: आदेश:-**

शासन अधिसूचना वित्त विभाग क्रमहाराष्ट्र2019 जानेवारी 30 दिनांक ,9.सेवा/.क्र.प्र/2019-वेपूर. नागरी सेवा (सुधारित वेतन) 2019-नियम दिनांक 2016 जानेवारी 1 पासून राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली आहेया . कार्यालयाचे आदेश क्रमांक नाजीग्रा10/06/2024 दिनांक /5455/2144/पोहवा-पदोन्नती/9-डी/पासून पोलीस हवालदार या रिक्त पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती दिल्याने त्यांना पदोन्नतीच्या पदाची वेतन स्तर एसमध्ये पदोन्नती (83600-26400) 09-च्या दिनांकापासून पुढील प्रमाणे वेतन निश्चिती करण्यात येत आहे.
वेतन संरचना-:

| पदनाम | सुधारित वेतन स्तर |
|---|---|
| पोलीस नाईक | एस81100-25500 -: 8- |
| पोलीस हवालदार | एस83600-26400 -: 9- |

1. **नापोशि 956 /संदीप बादल वासनिक, नेमणूक पोदेवलापार.स्टे.**

| दिलेले वेतन | | | पदोन्नतीचे वेतन | | | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| दिनांक | वेतन स्तर | वेतन | दिनांक | वेतन स्तर | वेतन | |
| 01.07.2023 | एस8- | 34300 | 10.06.2024 | एस9- | 34400 | पोहवा पदावर पदोन्नती |
| 01.07.2024 | एस-8 | 35300 | 01.07.2024 | एस8- | 35300 | पोना पदावरील नियमित वेतनवाढ |
| | | | 01.07.2024 | एस9- | 36500 | विकल्पानुसार वेनिश्चिती . |

2. **नापोशि1011 / मंगेश वामनराव भालेराव.स्टे.नेमणूक पो ,एमआयडीसी**

| दिलेले वेतन | | | पदोन्नतीचे वेतन | | | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| दिनांक | वेतन स्तर | वेतन | दिनांक | वेतन स्तर | वेतन | |
| 01.07.2023 | एस8- | 34300 | 10.06.2024 | एस9- | 34400 | पोहवा पदावर पदोन्नती |
| 01.07.2024 | एस-8 | 35300 | 01.07.2024 | एस8- | 35300 | पोना पदावरील नियमित वेतनवाढ |
| | | | 01.07.2024 | एस9- | 36500 | विकल्पानुसार वेनिश्चिती . |

या कार्यालयाचे आदेश क्रमांक नाजीग्रा /9-डी/पदोन्नती06/2024/10 दिनांक/5455/2144/पोहवा- अन्वये पोलीस नाईक यांची पोलीस हवालदार पदावरील पदोन्नतीची वेतन निश्चिती करण्यात येतअसूनशासन परिपत्रक-वित्त विभाग क्रमांक संकिर्ण , ,3-सेवा/52.क्र.प्र/2021 दिनांक 11.2021.22 अन्वयेअ ,टी व शर्ती नुसार भविष्यात अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यास अतिप्रदान वसुली करण्यात येईलअंमलदार यांच्याकडून वचन त्या पोलीस .पत्र भरून सेवापटात लावण्यात आले आहे.

**१३)क्रमांकः नाजीग्रा/डी-१३/ मपोना / ११६७ हर्षा/सिक रजा/ / २०२५, नागपूर दिनाक २०/०३/२०२५**

आदेश

मपोना / ११६७ हर्षा रवि यादव, नेमणुक पो. स्टे. कन्हान, नागपूर ग्रामीण हे दि.२९/१२/२०२ ते ०८/०१/२०२५ पर्यंत ११ दिवस गैरहजर कालावधी वैद्कीय कागदपत्राच्या आधारे महाराष्ट्र नागरी से रजा नियम १९८१च्या तरतुदीनुसार परिवर्तीत रजा नियम - ६१ प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

**१४)क्रमांकः नाजीग्रा/डी-१३/ पोशि / ८७७चंद्रशेखर /सिक रजा/३३७६६ / २०२५, नागपूर दिनाक २०/०३/२०२५**

**आदेश**

पोशी चंद्रशेखर बोरकर ८७७ / , नेमणुक अपर पोलीस अधिक्षक कार्यालय, , नागपूर ग्रामीण हे दिनांक २६/०८/२०२४ ते २०/०९/२०२४ **पर्यंत २६ दिवस सिक कालावधी** वैद्कीय कागदपत्राच्या आधारे महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१च्या तरतुदीनुसार परिवर्तीत रजा नियम — ६१ प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

**१५)क्रमांकः नाजीग्रा/डी-१३/ पोशी १५३८ / मिर्झा /सिक रजा/३३४१६/ २०२५, नागपूर दिनाक २०/०३/२०२५**

## आदेश

पोशी १५३८ / मिर्झा फुरकाण बेग, नेमणुक पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण **,ते** दिनांक **२५/११/२०२३ ते ०३/१२/२०२३ पर्यत ९ दिवस गैरहजर कालावधी** वैद्कीय कागदपत्राच्या आधारे महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१च्या तरतुदीनुसार परिवर्तीत रजा नियम — ६१ प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे . तसेच वैद्यकीय रजा रजा खाती शिल्लक नसल्यामुळे **दिनांक** दिनांक ०४/१२/२०२३ ते ०७/१२/२०२३ **पर्यंत ०४ दिवस गैरहजर कालावधी**, वैद्कीय कागदपत्राच्या आधारे महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१च्या तरतुदीनुसार अर्जित रजेत नियम — ५० प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

16)क.पोअ/नाजिग्रा/डी–4/सुधारीत वेतन निश्चिती–राठोड/2719/2025 नागपूर दिनांक :– 20/03/2025

सुधारीत आदेश

खालील पोलीस उप निरीक्षक यांचे दिनांक 01/01/2016 पासून केलेल्या वेतननिश्चिती नुसार त्यांचे कनिष्ठ शासकिय अधिका–यांचा वेतनइतके वेतन एकवटत असल्याने त्यांची महाराष्ट्र नागरी सेवा सुधारीत वेतन नियम 2019 तसेच शासन परिपत्रक कमांक वेपूर–2019/प्र.क.8/सेवा–9 दिनांक 20/02/2019 मधील नियम क. 7 (अ) खालील पहिले परंतुका नुसार सदरहु पोलीस उपनिरीक्षक दिनांक 01/01/2016 पासून 7 व्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतननिश्चिती नुसार या कार्यालयाचे आदेश कमांक क.पोअ/नाजिग्रा/डी–4/सुधारीत वेतन निश्चिती–राठोड/2025 नागपूर दिनांक :– /01/2025 अन्वये वेतन निश्चिती करण्यात आलेली होती.

परंतु वरील आदेश रदद करून पुढील प्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

पोउपनि बाळू गोरोबा राठोड, नेमणूक पो.स्टे. सावनेर

7 व्या वेतन आयोगाप्रमाणे मुळ वेतनश्रेणीत वेतननिश्चिती

| यापूर्वी 7 व्या वेतन आयोगानुसार मंजुर केलेले वेतन | | | 7 व्या वेतन आयोगानुसार फेरबदल करून सुधारीत करण्यात येत असलेले मुळ वेतन | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | वेतनस्तर | देय वेतन | दिनांक | वेतनस्तर | देय वेतन |
| 01.01.2016 | एस – 14 | 38600 | 01.01.2016 | एस – 14 | 39800 |
| 01.07.2016 | एस – 14 | 39800 | 01.07.2016 | एस – 14 | 41000 |
| 01.07.2017 | एस – 14 | 41000 | 01.07.2017 | एस – 14 | 42200 |
| 01.07.2018 | एस – 14 | 42200 | 01.07.2018 | एस – 14 | 43500 |
| 01.07.2019 | एस – 14 | 43500 | 01.07.2019 | एस – 14 | 44800 |
| 01.07.2020 | एस – 14 | 44800 | 01.07.2020 | एस – 14 | 46100 |
| 01.07.2021 | एस – 14 | 46100 | 01.07.2021 | एस – 14 | 47500 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 01.07.2022 | एस – 14 | 47500 | 01.07.2022 | एस – 14 | 48900 |
| 01.07.2023 | एस – 14 | 48900 | 01.07.2023 | एस – 14 | 50400 |
| 01.07.2024 | एस – 14 | 50400 | 01.07.2024 | एस – 14 | 50400 पुढील देय होणारी वार्षिक वेतनवाढ दोन ( वर्षा करिता स्थगित करणे हि शिक्षा असल्यामुळे |

सदरहु वेतन निश्चिती ही वेतन पडताळणी पथकाकडुन होण्या–या वेतन निश्चितीच्या तपासणीच्या अधीन राहुन करण्यात येत असून शासन परिपत्रक,वित्त विभाग क्रमांक संकीण्र –2021/प्र.क्रं. 52/सेवा–3 दिनांक 22.11.2021 अन्वये अटि व शर्ती नुसार भविष्यात अतिप्रदान झाल्याचे निर्देशनास आल्यास अतिप्रदान वसुल करण्याबाबतचे संबधित पोलीस अधिकारी यांनी हमीपत्र दिलेले आहे.

सदरहु वेतन निश्चिती ही वेतन पडताळणी पथकाकडुन होण्या–या वेतन निश्चितीच्या तपासणीच्या अधीन राहील. व अशा वेतन पडताळणी पथकाकडुन होण्या–या तपासणी नुसार केलेल्या वेतन निश्चीती मध्ये बदल अपेक्षित असल्यास /झाल्यास (वेतन पुननिश्चितीमुळे ) पुर्वीच्या वेतन निश्चितीप्रमाणे जादा झालेले वेतन व भत्ते त्याचप्रमाणे अदा झालेले फरकाच्या जादा रक्कमेची वसुली करण्यांत येईल.

**17)क्रमांकः- पोअ/नाजिग्रा/डी-4/ गणवेष भत्ता पो. अ./2741/2025 - नागपुर दिनांकः- 21/03/2025**

**-: आदेश :-**

महाराष्ट्र शासन गृह विभाग, शासन निर्णय कमांक एमआयएस 1316/प्र. क. 205/पोल-4, मुंबई दिनांक 05/01/2023 अन्वये खालील नमुद पोलीस अधीकारी यांना रु. 6000/- गणवेष भत्ता वित्तीय वर्ष 2024-2025 करिता मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क. | पोलीस अधिकारी यांचे नाव | नेमणूक | देय रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | पोउपनि / प्रविण धर्मदास भिमटे | अर्थिक गुन्हे शाखा | रूपये 6000/- |
| 2 | पोउपनि / मनिषा संजय चव्हाण | पोस्टे खापा | रूपये 6000/ |
| 3 | पोउपनि / राकेश सिध्दार्थ बोदेले | पोस्टे खापरखेडा | रूपये 6000/- |
| 4 | पोउपनि / शंकर रामराव चव्हाण | पोस्टे काटोल | रूपये 6000/- |
| 5 | पोउपनि / विजय एस. माळी | पोस्टे जलालखेडा | रूपये 6000/- |
| 6 | पोउनि/आश्विनी विलास पाटील | पोस्टे सावनेर | रूपये 6000/- |

सदरचा खर्च 2055 पोलीस (00) 109 जिल्हा पोलीस (00) (00) (01) - जिल्हा पोलीस बल (20550168) या उपलेखाशिर्षातंर्गत "25 - पोशाख, राहुटी व भंडारे " आणि या अधिष्टाखाली सन 2024 -2025 करिता मंजुर असलेल्या अनुदानातुन आंहरीत करण्यास याव्दारे मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

**18) क्रमांक :- पोअ/नाजिग्रा/डी-४/प्रत्यार्पित रजा/२०२५-2786 नागपूर दिनांक २०/०३/२०२५**

**आदेश**

महाराष्ट्र शासन गृह विभाग क्रमांक एलव्हीई -२००३/प्र.क्र.५६४/पोल-५ (ब), दि.१०/०४/२००७ च्या तरतुदिनुसार खालील नमुद पोलीस अधिकारी यांना सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाकरीता १५ दिवस प्रत्यार्पित (रोखीकरण) करण्याची मंजूरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | पोलीस अधिकारी यांचे नाव पदनाम | नेमणूक | प्रत्यार्पित रजा | शिल्लक अजित रजा |
|---|---|---|---|---|
| १. | पोनि/सारीन दुर्गे | पो.स्टे. मौदा | १५ दिवस | १३३ |
| २. | पोनि/रविंद्र अण्णाजी मानकर | पो.स्टे. सायबर | १५ दिवस | १९२ |
| ३. | पोउपनि/गणेश पडवार | पो.स्टे. नरखेड | १५ दिवस | ३०० |
| ४. | सपोनि/अविनाश मेश्राम | पो.स्टे. काटोल | १५ दिवस | २२६ |
| ५. | सपोनि/राजेश केशवराव साठवणे | नियंत्रण कक्ष ना.ग्रा. | १५ दिवस | १५२ |
| ६. | सपोनि/मनोज गदादे | स्थानिक गुन्हे शाखा | १५ दिवस | १७८ |
| ७. | सपोनि/किशोर शेरकी | स्थानिक गुन्हे शाखा | १५ दिवस | २१८ |
| ९. | पोउपनि/संतोष गणेश चव्हाण | पो.स्टे. रामटेक | १५ दिवस | २६५ |
| ८. | सपोनि/फाल्गुन घोडमारे | पो.स्टे. बेला | १५ दिवस | १५ |
| १०. | पोउपनि/श्रीकांत लांजेवार | पो.स्टे. उमरेड | १५ दिवस | ११९ |

प्रमाणीत करण्यात येते की, वर नमुद पोलीस अधिकारी यांचे सेवापुस्तक १५ दिवस प्रत्यार्पित रजेची नोंद घेण्यात आलेली आहे.

# भाग —३ (कसुरी,शिक्षा)

## १)क्रमांक:- नाजिग्रा/डी-१०/निर्वाह भत्ता/पोशि १२६१ देशमुख/२७४८/२०२५नागपुर दिनांक :-२१/०३/२०२५

**आ दे श**

खालील नमुद केलेले पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या दिनांकापासुन त्यांचे निलंबनाचे कालावधीस ०३ महीन्याचे वरील कालावधी झाल्याने त्यांना महाराष्ट्र वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक डीआरएस १०८१/सीआर—८७७/एसईआर—८, दिनांक १० डिसेंबर १९८१ अन्वये निलंबित पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचा वाढीव निर्वाह भत्ता मंजुर करण्याची तरतुद आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फ सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियमय ६८ मधील पोटनियम **''ए''** अन्वये ३ महीण्यानंतर निर्वाह भत्ता वाढविण्याची तरतुद केलेली आहे.

खालील नमुद केलेले पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना उपलब्ध असलेल्या अभिलेखावरून त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या दिनांकापासुन ७५% निर्वाह भत्ता मंजुर करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | हुद्या/ब.क्र./नांव | निलंबन दिनांक | मंजुर केलेल्या निर्वाह भत्याचा दिनांक | मंजुर केलेल्या निर्वाह भत्याची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | पोशि/१२६१ आदित्य देशमुख | १९/११/२०२४ | २०/०२/२०२५ | ७५% |

## २)क्रमांक :- नाजिग्रा/डी-१०/सफौ-२९८ रामटेके/विचौ/अं.आ./२७२७/२०२५ नागपूर दि.२०.०३.२०२५

**आदेश**

**कसुरदारांचे नांव :— सफौ/२९८ खुशाल रामटेके** नेमणुक पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण

**दोषारोप :—** १) अत्यंत बेशिस्तपणा, बेजबाबदारपणा व कर्तव्यच्युतीयुक्त आचारण की, ज्यात आपण पोलीस मुख्यालय येथे नेमणुकीस असुन आपल्या व्हॉट्सअॅप Status वर धार्मीक व जातीय तेढ निर्माण करणारे, हिंदु देवी—देवतांचा अपमान करणारे आक्षेपार्ह लिखाण असलेले पोस्ट ठेवल्यामुळे हिंदु समाजबांधवाच्या धार्मीक भावना दुखावुन त्यावर त्यांचे प्रतिक्रिया उमटल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता निर्माण झाल्यामुळे नागपूर ग्रामीण पोलीस दलाची प्रतिमा समाज माध्यमांमध्ये मलीन झालेली आहे. पोलीस दल हा शिस्तप्रिय असुन तुमचे वर्तन पोलीस दलातील शिस्तीस अनुसरून नाही.

२) महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ मधील नियम २४ मध्ये कोणताही शासकीय कर्मचारी ज्या कोणत्याही कृत्यामुळे धार्मिक, जातीय, प्रादेशिक, वांशिक किंवा इतर कारणावरून भारतातील विभिन्न जमातींमध्ये तिरस्काराची भावना किंवा द्वेषभावना चेतवली जाते आणि निर्माण केली जाते अशा कोणत्याही कृतीमध्ये लेखी, भाषणाव्दारे किंवा कृतीव्दारे किंवा अन्यथा स्वत:स गुंतवुन घेणार नाही अशी तरतुद असतांना आपणाकडुन सदर तुरतुदीचे उल्लंघन करण्यात आले आहे.

३) ''अभद्र टिपणी करने वाले हवालदार पर मामला दर्ज '' अशी बातमी नवभारत वृत्तपत्रात व ''कन्हान पोलीस ठाण्यात हवालदारा विरूध्द गुन्हा दाखल '' झाल्याबाबत लोकमत या वृत्तपत्रात बातमी प्रसीध्द झाल्यामुळे पोलीस दलाची जनसामान्यमध्ये प्रतिमा मलीन झाली.

वरील कसुरीबाबत आपली विभागीय चौकशी करण्यात आली असता विभागीय चौकशी अंती अ.क्र. १ ते ३ वर नमूद दोषारोप पुर्णत:सिध्द झाले असल्याबाबत विभागीय चौकशी अधिकारी यांनी त्यांचे समारोप अहवालात नमुद केले आहे.

आपणास महाराष्ट्र पोलीस नियम १९५६ (शिक्षा व अपील) मधील नियम—३ अन्वये **'' सहा.पोलीस उप निरीक्षक या पदावरून पोलीस हवालदार या पदावर ०६ महिने किंवा सेवानिवृत्तीचा दिनांक (३०/०७/२०२५) पर्यत पदावनत करणे ''** या शिक्षेची कारणे दाखवा नोटीस दि. २४/०१/२०२५ रोजी निर्गमित करण्यात आलेली असुन, सदरची नोटीस आपण दि. ०८/०२/२०२५ रोजी स्वीकारून स्पष्टीकरण सादर केले. तसेच दि. १३/०३/२०२५ रोजी व्हिडीओ कॉन्फरसिंगव्दारे आपला आज्ञाकिंत कक्ष घेण्यात आला. सदर व्हिडीओ कॉन्फरसिंगव्दारे घेतलेल्या आज्ञांकीत कक्षात आपण ३४ वर्ष सेवा झालेली असुन मला ४ महिने सेवानिवृत्तीस शिल्लक आहे. या व्यतिरिक्त आपण आपल्या विरूध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपाशी सबंधीत कोणताही ठोस मुद्ये उपस्थित केले नाही. कारणे दाखवा नोटीस मध्ये प्रस्तावित केलेल्या शिक्षेबाबत कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण दिले नसल्याने खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## अंतिम आदेश

मी, हर्ष ए.पोद्दार (भापोसे), पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण, नागपुर **'' सफौ/२९८ खुशाल रामटेके यांना सहा.पोलीस उप निरीक्षक या पदावरून पोलीस हवालदार या पदावर आदेश निर्गमीत झाल्याचे तारखे पासुन सेवानिवृत्तीचा दिनांक (३०/०७/२०२५) पर्यत पदावनत करणे ''** ही शिक्षा देण्यात येत आहे. सदरहू शिक्षेने आपण व्यथीत होत असल्यास सदरहू आदेश स्वीकारल्याचे दिनांकापासुन ६० दिवसाचे आत या कार्यालया मार्फत विशेष पोलीस महानिरिक्षक, नागपुर परिक्षेत्र, नागपुर यांचे कडे अपील करू शकतात.

3)**नाजिग्रा/कसुरी/डी-१५/अं.आ./सफौ/५८२ विठठल वंजारी/पो.स्टे. खापरखेडा/** 2759 **नागपूर दिनांक:-** 21/03/2023

## आदेश

**कसुरदाराचे नांव:**- सफौ/५८२ विठठल वंजारी, नेमणुक पोलीस स्टेशन, खापरखेडा, नागपूर ग्रामीण,

**कसुरी**:-

अत्यंत बेशिस्तपणा, बेजबाबदारपणा व कर्तव्यच्युतीयुक्त आचरण की, आपण पोलीस स्टेशन खापरखेडा येथे कार्यरत असून आपण वलनी चौकी मध्ये चौकी प्रमुख असून दिनांक २४/१/२०२५ रोजी अर्जदार हिरालाल कश्चप रा. वलनी कॉलनी व गैरअर्जदार मेहताब आलम मोहम्मद रफिक सलमानी वय २९ रा. वलनी कॉलनी वार्ड क्र. ४ हे दोन्ही एकमेकांना ओळखतात, अर्जदार व गैरअर्जदार हे दोन्ही एकाच वार्ड मध्ये राहत असल्याने गैरअर्जदार मेहताब आलम मोहम्मद रफिक सलमानी यांची अर्जदार हिरालाल कश्चप यांनी जुन्या वादाच्या झगडावरुन पोस्टे येथे रिपोर्ट दिल्यावरुन गैरअर्जदार यांनी शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली. यावरुन अर्जदार यांनी पोस्टे खापरखेडा येथे अप.क्र. ३४/२५ कलम ३५२,३५१, (२) (३) बी.एन. एस. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेले आहे. आपण वलनी चौकी प्रमुख असून आपल्या चौकी हद्दीमध्ये जुने भांडणाची माहिती असणे अपेक्षित होते. तसेच अर्जदार व गैरअर्जदार यांच्या मध्ये मध्यस्ती करुन जुनेवाद संपुस्टात आणाचे काम केले असते तर हि घटना घढली नस्ती करीता आपण आपले कर्तव्यात कसुर केला आहे.

उपरोक्त कसुरीबाबत आपणांस महाराष्ट्र पोलीस नियम १९५६ (शिक्षा व अपील) मधील नियम क्र.३ (२) (५) मध्ये नमुद केल्याप्रमाणे रु ५,०००/- आर्थीक दंड" ही शिक्षाचे कारणे दाखवा नोटीस दिनांक २३/०१/२०२५ रोजी निर्गमित करण्यात आले असून सदरची नोटीस आपण दिनांक. ०३/०३/२०२५ रोजी स्पष्टीकरण सादर केले. स्पष्टीकरणाचे अवलोकन केले असता आपण सादर केलेले स्पष्टीकरण समाधानकारक नसल्याने कारणे दाखवा नोटीस मध्ये प्रस्तावित केलेल्या शिक्षेत फेरबदल न करता खालील प्रमाणे अंतिम आदेश देत आहे.

**-: अतिमं आदेश :-**

मी हर्ष ए पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर (जिल्हा) ग्रामीण या आदेशाद्वारे सफौ/५८२ विठठव वंजारी, नेमणुक पोलीस स्टेशन, खापरखेडा, नागपूर ग्रामीण यांना उपरोक्त कसुरीबाबत आपणास "-५,०००/- आर्थीक दंड" हि शिक्षा देण्यात येत आहे. सदरहु शिक्षेने व्यथीत होत असल्यास हा आवे प्राप्त झाल्याच्या दिनांकापासुन ६० (साठ) दिवसाचे आत या कार्यालयाचे मार्फत विशेष पोल महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांना अपील अर्ज सादर करू शकतात.

# भाग—४ (बक्षिस आदेश)

निरंक

# भाग —५ (प्रशिक्षण,परवानगी,अग्रीम)

**कमांक: नाजिग्रा/डी-१४/घर बांधकाम — परवानगी/ पोना/१०९९ /३३१८९/२०२५, नागपूर दिनांक :-२०/०३/२०२५**

**-: आदेश :-**

खालील नमुद पोलीस अंमलदार यांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील पोटनियम १९ (२) च्या तरतुदीनुसार त्यांचे नावासमोर दर्शविल्या प्रमाणे मालमत्ते वर खालील नमूद अटी चे अधीन राहून बांधकाम करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र | पोलीस अंमलदार यांचे नाव व नेमणूक | मालमत्ते विवरण | प्लॉट खरेदीची एकुण किमत |
|---|---|---|---|
| १ | पोना/1099 किशोर मारोतराव येंगलवार , नेमणुक बॉम शोधक व नाशक पथक, नागपूर ग्रामीण | मौजा नरसाळा तह. नागपुर ग्रामीण पहन. 37, खसरा शेत नं. नं.179 प्लांट क्र. 87, ग्रामपंचायत घर नं.146, 1050 चौरस.फुट | एकुण किंमत रूपये 2,20,000/- |

उपरोक्त नमुद पोलीस अंमलदार यांनी भूखंड खरेदी व बांधकाम खर्चाच्या हिशोबाची कागदपत्रे स्वतःजवळ सांभाळुन ठेवावी व वरिष्ठांनी मागणी केल्यास वेळीच सादर करावी.

**क्र-नाजिग्रा /डी.13/पोहवा मयूर १०४८/२०२५/इंडोनेशिया / ३२२३७ /परवानगी/२०२५ नागपुर, दिनांक २०/०३/२०२५**

आदेश

पोहवा मयूर रमेश ढेकळे १०४८/,स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण दी या कालावधी २०२५/०४/२६ते २०२५/०४/१८ .मध्ये परिवारासह धार्मिक कार्यासाठी बळी इंडोनेशिया येथे जाण्याची परवानगी मिळनेस विनंती केली असल्याने खालील अटी व शर्थीच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

**<u>अटी व शर्ती</u>**

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र-परदौ .1420/प्र.क्र.26/11 दिनांक 1/2/2021 चे परिपत्रका अन्वये

1. शासनाचे अधिकारीकर्मचारी स्वखर्चाने रजा घेवू/न विदेशात प्रशीक्षण, चर्चासत्र, शोधनिबंध सादर करणे अशा कारणांसाठी जात असतील आणि त्यांच्या विदेश दौयामुळे शास-नावर आर्थिक भार पडत नसेल तर अशी प्रकरणे शीफारस समिती समोर सादर करण्याची आवश्यकता नाहीतथापि ., अशा प्रकरणी शासन स्तरावर मान्यता घेण्यात यावी व दौयाच-्या कालावधीत सबंधीत अधिकायाकडून - नियम (वर्तणूक) महाराष्ट्र नागपूर सेवा, 1979 मधील कोणत्याही तरतुदींचा भंग केला जाणार नाही अशी अट मंजुर आदेशात समाविष्ट करण्यात यावीया प्रकरणी कोणत .ही संस्थेकडून प्रवासखर्च, विदेषी वास्तव्याच्या खर्च वा अन्य कोणत्याही प्रकारचे आदरातिथ्य स्वाकारु नये .

2. विदेशांत राहणाया नातेवाईकांना भेटणे-, पर्यटन, वैदयकिय उपचार घेणे अशा खाजगी कारणांसाठी करावयाच्या विदेश दौयाच्या - प्रकरणामध्ये प्रस्तावशीफारस समितीसमोर सादर करण्याची आवष्यकता नाहीमात्र ., अशा प्रकरणी अधिकारी /कर्मचायास रजा मंजूर - या प्रकारचे दौरे कोणत्य .याची पुर्वपरवानगी घेण्यात यावी-या प्राधिका-करण्यास सक्षम असणाही खाजगीच्या वाणिज्यिक संस्थे/ आमंत्रणावरुन करु नयेत व अशा कोणत्याही संस्थेकडून प्रवासखर्च, विदेशी वास्तव्याच्या खर्च वा अन्य कोणत्याही प्रकारचे आदरातिथ्य स्वीकारु नये .

Signed by
Umesh Ghaninath Funde
Date: 19-06-2025 16:54:27

**(उमेश फुंदे)**
कार्यालय अधिक्षक
पोलीस अधीक्षक,कार्यालय
नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर

प्रति,
सर्व ठाणेदार/रापोनि.मुख्या./बि.संदेश/जि.वि.शा/नियं.कक्ष/स्था.गु.शा./मो.प.वि./पो.अधि.वा. शाखा/अ.पो.अधि.वा.शाखा/म.त.नि /कार्या अधिक्षक/डी—४/डी—७/डी—९बी/डी—११/डी—१२/ डी—१३/लघुलेखक/वे.नि.लपीक/कल्याणशाखा/सुरक्षाशाखा / वाहतुक शाखा ना.ग्रा.
प्रत सस्नेह अग्रेषित :— अ.पो.अधि.नाग्रा/महामार्ग सूरक्षा पथक/नागरी हक्क संरक्षण केंद्र.
प्रतिलिपी :— पो.उप अधि.(गृह) व सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी ना.ग्र. यांना आवश्यक कार्यवाहीस
२/— सदरची मराठी साप्ताहीक पोलीस पत्रिका ही रोलकॉलवर वाचून दाखविण्यात यावी व संबंधितास समज देऊन त्यांचा नावापूढे त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी.